विद्यादान हे अन्नदानापेक्षा मोठे आहे. कारण अन्नाने क्षणिक तृप्ती मिळते, तर विद्येने जीवनभर आनंद मिळतो.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार ११ फेब्रुवारी २०२५ | अंक६५ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




## दिल्लीत भाजपचा दणदणीत विजय

गेल्या आठवड्यात ५ फेब्रुवारीला दिल्ली विधानसभा निवडणुकांसाठी मतदान झालं तर शनिवारी, ८ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होऊन निकाल लागला. या निवडणुकीत २७ वर्षांनंतर भाजप प्रचंड बहुमताने सत्तेत आला आहे. भाजपने ७० पैकी ४८ जागा जिंकल्या तर सत्ताधारी आम आदमी पक्षाचा दारूण पराभव झाला. अरविंद केजरीवाल यांच्या ङ्गआपफ्ला अवघ्या २२ जागा मिळाल्या. एवढंच नव्हे तर अरविंद केजरीवाल आणि मनिष सिसोदियांनाही पराभव पत्करावा लागला. तर या

# आपमध्ये मोठी फूट पडणार होती, १५ उमेदवार होते संपर्कात

## एकनाथ शिंदे यांचा दावा काय?



दिल्ली विधानसभा निवडणूका नुकत्याच पार पडल्या आणि शनिवारी त्याचा निकालही लागला. या निवडणुकीत मतदारांनी भाजपवर विश्वास दाखवत भरघोस मतदान केल्याने तब्बल दोन दशकानंतर भाजपचे दिल्लीत पुनरागमन झाले आहे. तर सत्ताधारी आम आदमी पक्ष अर्थात आपचा दारूण पराभव झाला. याच दरम्यान महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेना प्रमुख एकनाथ शिंदे यांनी केलेल्या एका दाव्याने मोठी खळबळ माजली आहे. दिल्लीत विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी आपच्या १५ उमेदवारांनी (शिवसेना) पक्षाच्या चिन्हासाठी आपल्याशी संपर्क साधला होता, परंतु युतीच्या युती धर्माला जागत आपण तो प्रस्ताव नाकारला, असा दावा एकनाथ शिंदे यांनी केला. १५ उमेदवार आपल्या संपर्कात होते, आपमध्ये मोठी फूट पडणार होती असं त्यांनी अप्रत्यक्षरित्या सांगितलं.एकनाथ शिंदे यांचा नुकताच वाढदिवस झाला, त्यानिमित्ताने ठाण्यात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी बोलतानाच एकनाथ शिंदे यांनी हे विधान केलं. आपचे १५ उमेदवार आपल्या संपर्कात होते, असे वक्तव्य शिंदे यांनी केलं. आप चे ( आम आदमी पक्ष) एकूण १५ उमेदवार माझ्यापर्यंत पोहोचले होते. शिवसेनेच्या चिन्हावर निवडणूक लढवण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. पण धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह त्यांच्याकडे गेले तर निवडणुकीत भाजप आणि शिवसेनेची बीज मते विभागली जातील, ज्याचा फायदा इतरांना होईल, असं मला वाटले. म्हणून मी त्यांना नकार दिला, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.भाजपचा प्रचार करण्याचे निर्देश याच कार्यक्रमात शिंदेनी आपण युतीधर्माल जागल्याचाही पुनरुच्चार केला. दिल्ली विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांचा प्रचार करा असे निर्देश मी आमच्या पक्षाच्या खासदारांना दिल्याचंही शिंदे यांनी नमूद केलं. युती धर्माचा आदर राखण्यासही खासदारांना सांगण्यात आलं होतं. एकनाथ शिंदे यांचा नुकताच वाढदिवस झाला, त्यानिमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह अनेकांनी आपल्याला शुभेच्छा दिल्याचं शिंदे यांनी आवर्जून सांगितलं. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून नव्हे तर एकनाथ शिंदे म्हणून त्यांनी माझं स्वागत केलं,असेही शिंदे म्हणाले.

## केज पोलिसांमुळे आंधळेला अभय : धनंजय देशमुख

केज : आज कृष्णा आंधळे सापडत नाही. तो बाहेर राज्यात गेला असू शकतो, असे सांगण्यात येते. परंतु, त्याला मिळालेले अभय हे सर्वस्वी केज पोलिसांचे पाप आहे. त्यांनी घडलेल्या प्रकरणाला हलक्यात न घेता वेळीच कडक कारवाई केली असती हे सगळे घडले नसते, असा आरोप संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी केला आहे. दि. ९ डिसेंबर रोजी संतोष देशमुख यांची हत्या झाली होती. त्याआधी सहा डिसेंबरला आरोपी आणि संतोष देशमुख यांच्यामध्ये झालेल्या भांडणाची तक्रार केज पोलिस ठाण्यात देण्यात आली होती. यावेळी पोलिसांनी संबंधित आरोपींना हलक्यात घेऊन त्यांचा टेबल जामीन करण्यात आला. त्याच वेळी त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात आली असती तर पुढची घटना घडलीच नसती, असा आरोप देशमुख यांनी केला आहे. तसेच, सध्या प्रमुख आरोपींपैकी फरारी असलेल्या कृष्णा आंधळेंबद्दल बोलताना त्यांनी सांगितले, की मखुनाची घटना घडल्यानंतर साडेदहा वाजेपर्यंत सर्व आरोपींचे मोबाइल चालू होते. पोलिसांकडून कुठलाच मोबाइल ट्रेस करण्यात आला नाही. केज पोलिसांना घटनेचे गांभीर्य नसल्याने हे सगळे वाढत गेले. आता कृष्णा आंधळे हा बाहेर राज्यात गेला असल्याचे सांगण्यात येते. परंतु, त्याला अभय हे पोलिसांमुळेच मिळाले असून तो सापडत नाही हे पोलिसांचे अपयश आहे.

## सोमनाथ सूर्यवंशी मृत्यूप्रकरणात फौजदारासह ४ पोलिस निलंबित

परभणी : सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू न्यायालयीन कोठडीत असताना झाला होता. आता या प्रकरणात पोलिसांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूप्रकरणी जिल्हा पोलिस दलातील पोलिस अधिकारी आणि ३ पोलिस असे एकूण ४ पोलिसांना निलंबित करण्यात आले आहे.त्यामुळे जिल्हा पोलिस दलामध्ये खळबळ उडाली आहे. सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणात याआधीच पोलिस निरीक्षक अशोक घोरबांड यांना निलंबित करण्यात आले होते. आता या



प्रकरणामध्ये आणखी ४ पोलिसांना निलंबित करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्हा पोलिस दलामध्ये खळबळ उडाली आहे. परभणी शहरातील नवा मोंढा पोलिस ठाण्यामध्ये कार्यरत असलेल्या फौजदार कार्तिकेश्वर तुरनर, पोलिस अंमलदार सतीश दैठणकर, मोहित पठाण आणि राजेश जटाळ या चार पोलिसांविरोधात निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. परभणीतील हिंसाचार प्रकरणात अटक करण्यात आलेल्या सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाचा पोलिस कोठडीमध्ये मृत्यू झाला होता. पोलिसांच्या अमानुष मारहाणीत सूर्यवंशींचा मृत्यू झाल्याचा आरोप करण्यात येत होता. राज्य शासनाने दिलेली दहा लाखांची मदत सुद्धा त्यांच्या कुटुंबियांनी नाकारली होती. तर न्यायासाठी मुंबईपर्यंत लाँग मार्च सुद्धा काढण्यात आला.पण भाजप आमदार सुरेश धस आणि आमदार मेघना बोर्डीकर यांनी मध्यस्थी केली आणि लाँग मार्च काढणाऱ्यांची समजूत काढली. त्यानंतर हा लाँग मार्च स्थगित करण्यात आला.१ महिन्यात सर्व मागण्या पूर्ण न झाल्यास नाशिकपासून पुन्हा लाँग मार्च काढण्याचा इशारा आंदोलकांनी दिला. आता याप्रकरणात ४ पोलिसांना निलंबन करण्यात आलं. जवळपास दोन महिन्यांनी कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे.

## जरांगे पाटील यांच्या आर्शिवादाने ओबीसीतुन मुंबई पोलीस !



केज : केज तालुक्यातील ढाकेफळ गावची लेक वैष्णवी थोरात मुंबई पोलीस मध्ये निवड झाली आहे. ही निवडणूक कुणबी मराठा प्रमाणपत्रा मुळे झाली असुन कुणबी मराठा प्रमाणपत्र मिळविण्यासाठी मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांनी जिवाचे रान करुन प्रमाणपत्र मिळऊन दीले आहेत. त्यामुळे केज तालुक्यात असे चर्चा सत्र सुरू झाले आहे की पाटलांनी काय केलं अस विचारणाऱ्यांना ठासुन सांगीतले पाहीजे कुणबीत गेलो ओबीसीत गेलो म्हणुन आज गावची लेक आमची भगिनी वैष्णवी श्रीकीसन थोरात (ताईची) मुंबई पोलीस झाली आहे.

## श्री छत्रपती शाहू प्राथमिक शाळेस संसदरत्न खासदार श्रीकांत शिंदे साहेब चषक प्रदान

.बीड प्रतिनिधी - दरवर्षीप्रमाणे याही वर्षी जिल्हास्तरीय चंपावती महोत्सव २०२५ घेण्यात आला. या महोत्सवामध्ये श्री छत्रपती शाहू प्राथमिक शाळेने घवघवीत यश संपादन केले. शाळेतील विद्यार्थ्यांनी वैयक्तिक नृत्य ,सामूहिक नृत्य ,जोडी नृत्य एकपात्री अभिनय ,चित्रकला ,रांगोळी, अशा वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला. जिल्ह्यामधील सर्व सहभागी शाळा पैकी छत्रपती शाहू प्राथमिक विद्यालय २२ पुरस्कारासह चषकाची मानकरी




ठरली. सदर स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी शाहू विद्यालयाच्या एकूण ४४० विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आली . या सर्व विद्यार्थ्यांना श्रीमती कांबळे शोभा मॅडम यांनी मार्गदर्शन केले. सर्व विद्यार्थ्यांना जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे सचिव माननीय अजय पाटील साहेब तसेच पौर्णिमा अजय पाटील मॅडम संस्थेचे अध्यक्ष माननीय आगळे साहेब या सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच शाळेचे मुख्याध्यापक माननीय भोसले सर ,राऊतमारे सर यांनी देखील शुभेच्छा दिल्या. चंपावती महोत्सवाचे आयोजक माननीय प्रतीक कांबळे सर यांनी मुलांना कला गुण सादर करण्यासाठी जे व्यासपीठ उभारून दिले त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांचे कलागुण सादर करता आले त्याबद्दल त्यांचे मनस्वी आभार.

## कृष्णा आंधळेला पोलिसांमुळेच अभय, धनंजय देशमुखांचा गंभीर आरोप

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील प्रमुख आरोपी कृष्णा आंधळे हा अद्यापही फरार आहे. घटनेच्या दीड महिन्यांनंतरही त्याचा शोध लागू न शकल्याने पोलिसांनी कृष्णा आंधळेला वॉन्टेड घोषित केले आहे. इतकेच नाही तर त्याला शोधणाऱ्या व्यक्तीला बक्षीस देण्यात येणार असल्याची घोषणा देखील पोलिसांकडून करण्यात आली आहे. मात्र आता दोन महिने उलटले तरी कृष्णा आंधळेचा शोध काही लागताना दिसत नाही. त्यामुळे तो महाराष्ट्राच्या बाहेर तर गेला नाही ना? अशी शंका आता उपस्थित होत आहे. अशातच मृत संतोष देशमुख यांचा भाऊ धनंजय देशमुख याने कृष्णा आंधळेला पोलिसांमुळेच अभय मिळाल्याचा आरोप केला आहे. माध्यमांशी संवाद साधताना धनंजय देशमुख म्हणाले की, ९ डिसेंबर रोजी संतोष देशमुख यांची हत्या झाली होती. मात्र त्याआधी सहा डिसेंबरला सर्व आरोपी आणि संतोष देशमुख यांच्यामध्ये झालेल्या भांडणाची तक्रार केज पोलीस ठाण्यात देण्यात आली होती. त्यावेळी पोलिसांनी संबंधित आरोपींना हलक्यात घेतल्यामुळे त्या सर्वांचा टेबल जामीन झाला. जर त्याचवेळी सर्व आरोपींवर कडक कारवाई करण्यात आली असती तर पुढची घटना घडलीच नसती, अशी खंत त्यांनी बोलून दाखवली. संतोष देशमुख म्हणाले की, संतोष देशमुख यांच्या खुनाची घटना घडल्यानंतर रात्री साडेदहा वाजेपर्यंत सर्व आरोपींचे मोबाइल सुरू होते. मात्र पोलिसांनी कोणताच मोबाइल ट्रेस केला नाही. केज पोलिसांना घटनेचे गांभीर्य नसल्याने हे प्रकरण वाढत गेले. यानंतर आता कृष्णा आंधळे हा बाहेरच्या राज्यात गेला असल्याचे सांगण्यात येत आहे. परंतु, त्याला पोलिसांमुळेच अभय मिळाले. त्यामुळे आता तो सापडत नाही हे पोलिसांचे अपयश आहे, असे म्हणत धनंजय देशमुख यांनी पोलिसांच्या कारवाईवर नाराजी व्यक्त केली.मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ०९ डिसेंबर रोजी हत्या करण्यात आली. सुदर्शन घुले, कृष्णा आंधळे, विष्णू चाटे या आरोपींना संतोष देशमुख यांचे अपहरण करून त्यांची निर्घृणपणे हत्या केली होती. ही हत्या होऊन दोन महिन्याचा कालावधी उलटला आहे. पण अजूनही आरोपी कृष्णा आंधळे हा फरार आहे. पोलिसांकडून आंधळेचा कसून शोध घेण्यात येत आहे. मात्र, अद्यापही तो पोलिसांच्या हाती लागलेला नाही. असे असले तरी या प्रकरणातील संशयित आरोपी वाल्मीक कराडसह इतर सर्व आरोपींवर मकोका लावण्यात आला आहे.

# उद्धव ठाकरे यांचे तीन बडे शिलेदार देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीला, राजकीय हालचालींना वेग

महाराष्ट्रातील राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणावर राजकीय हालचालींना वेग आला आहे. सोमवारी भाजप, उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि राज ठाकरे यांची मनसे या तीन पक्षांमध्ये अचंबित वाटणाऱ्या राजकीय हालचाली घडला. सकाळी मनसे नेते राज ठाकरे यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेतली. राज ठाकरे यांच्या निवासस्थानी ङ्गशिवतीर्थफ्वर या दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. त्यानंतर उद्धव ठाकरे यांचे तीन मोठे शिलेदार दुपारी मुख्यमंत्री आणि भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी दाखल झाले. त्यामुळे राज्यातील राजकारणात या गोष्टींची चर्चा सुरु झाली असून वेगवेगळे अर्थ काढले जात आहे. उद्धव ठाकरे यांचे हे शिलेदार सागर बंगल्यावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांचे तीन प्रमुख शिलेदार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर सोमवारी दुपारी दाखल झाले. त्यात मिलिंद नार्वेकर, सुभाष देसाई, अंबादास दानवे यांचा समावेश होता. त्यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. दादारमधील बाळासाहेब ठाकरे यांच्या राष्ट्रीय स्मारकासाठी ही भेट झाल्याचे खासगीरित्या या नेत्यांकडून सांगण्यात आले. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे. पुढील कामासाठी ही भेट होती. भेटीनंतर या तिन्ही नेत्यांनी माध्यमांशी संवाद साधला नाही. अंबादास दानव यांनी बोलण्याचे टाळले. त्यामुळे बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकासंदर्भात ही भेट होती की इतर कोणते राजकीय कारण होते? याबाबत चर्चा सुरु झाली आहे. राज ठाकरे-



फडणवीस भेटीचा अर्थ काय? राज ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांची भेट, त्यानंतर उद्धव ठाकरे यांचे प्रमुख शिलेदार आणि देवेंद्र फडणवीस यांची भेट या सर्व घडामोडींचा अर्थ वेगवेगळा काढला जात आहे. राज ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात झालेली भेट ही अनौपचारिक होती, असे आता भजपा नेते सुधीर मुनगंटीवार सांगत आहेत. परंतु राजकीय निरीक्षक या भेटीचे वेगवेगळे अर्थ काढत आहे. राज ठाकरे यांनी नुकतीच विधानसभा निवडणुकी निकालाबाबत शंका उपस्थित केली होती.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार ११ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### आपण जेव्हा कधी मोठ्या शहरात घर विकत घेतो

आपण जेव्हा कधी मोठ्या शहरात नवे घर विकत वा भाड्याने घेण्याचे ठरवतो, तेव्हा किती विचार करतो? आपल्याला परवडेल अशा किमतीत घरे जिथे आहेत, त्या जागा शोधतो. त्यानंतर ते घर रेल्वे स्टेशन, बस स्टॉपपासून जवळ आहे का, दुकाने, शाळा, कॉलेज, रुग्णालय, रेस्टॉरंट, मंडई, औषधाचे दुकान, दवाखाना आसपास आहे का, हे पाहतो. शिवाय पार्किंगची सोय, रस्ते, लोकवस्ती कशी आहे, हेही विचारून घेतो. जवळपास कारखाने, घाणेरडी गटारे, कचरा आणि झोपडपट्टी असेल, तर तिथे घर घेण्याचे टाळतो. त्यात काहीही गैर नाही. अनेक जण तर त्या वसाहतीत कोणती भाषा बोलणारे वा कोणत्या जाती-धर्माचे लोक राहतात, याचीही बारकाईने चौकशी करतात. हे सारे करण्यामागे जीवन सुसह्य, आनंददायी किंवा कमीत कमी त्रासदायक व्हावे, हा प्रयत्न वा इच्छा असते. आपली नोकरी, पगार, मुले या हिशेबाने प्रत्येकाला चांगले, सुखी जीवन हवे असते. मग त्यासाठी घरात एअर कंडिशनर, फ्रिज, वॉशिंग मशीन, ओव्हन, गिझर, शक्यतो स्मार्ट टीव्ही, कराओके, उत्तम साऊंड सिस्टीम, घराला द्यायच्या रंगांच्या शेड, चांगले मोबाइल व कार, वॉर्डरोब यासह काय काय हवे, याचीही यादी केली जाते. एकूणच ज्याला उत्तम दर्जाचे जीवन म्हटले जाते, त्याचा सर्वांनाच ध्यास असतो. मध्यवर्गीय लोक वा एकूणच सामान्य लोक आयुष्यात शक्यतो एकदाच घर विकत घेतात, त्यामुळे हे सारे केले जाते. इतका सारा विचार आपल्यापैकी बहुदा प्रत्येक जण करत असणार वा तो पूर्वी केला असणार. बांधकाम व्यावसायिकही घरांच्या जाहिराती करताना काय-काय नागरी सुविधा तिथे आहेत आणि फ्लॅट लवकर बुक केल्यास किंमत किती कमी करणार हे नमूद करतात. पण आपण जिथे घर घेणार आहोत वा ते घेतले आहे, तेथील हवेची गुणवत्ता कशी आहे, तिथे स्वच्छ हवा मिळते की प्रदूषित, हा विचारही आपल्या मनात अजिबात म्हणजे अजिबातच येत नाही. दिल्लीतील हवा फार वाईट आहे, तिथे केवळ थंडीतच नव्हे, तर वर्षाचे बारा महिने प्रदूषण असते, हे आपल्याला माहीत असते. त्यामुळे बरे झाले, आपल्याला तिथे राहण्याची वेळ आली नाही, असे बोलून दाखवतो. पण मुंबई, बंगळुरू या शहरांची स्थितीही तितकीच वाईट आहे. जितक्या सुविधा अधिक तितकी घराची किंमत अधिक असे गणित असेल, तर जिथे प्रदूषण अधिक वा हवेची गुणवत्ता म्हणजे एअर क्वालिटी इंडेक्स वाईट तिथे घरांच्या किमती कमीच असायला हव्यात की! हा विचार आपण करत नसलो तरी रिअल इस्टेट व्यवसायातील झिरोधा या बड्या कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन कामत यांनी सुरू केला आहे. स्वतः च्या दीर्घायुष्यासाठी विविध प्रयोग करणारे ब्रायन जॉनसन यांच्या एका ताज्या वक्तव्यानंतर ही बाब त्यांचा लक्षात आली. ब्रायन जॉनसन हे जैवतंत्रज्ञान क्षेत्रातील खूप मोठे नाव आहे. नितीन यांचे बंधू निखिल कामत यांच्या पॉडकास्टमध्ये मुलाखत द्यायला आलेले जॉनसन बंगळुरूमध्ये तोंडाला मास्क लावून बोलत होते आणि अचानक संभाषण थांबवून त्या स्टुडिओतून ते निघून गेले. इथे भयंकर प्रदूषण आहे, असा शेराही त्यांनी जाताना मारला. या घटनेची बरीच चर्चाही झाली. नितीन कामत यांच्या लक्षात आले की केवळ दिल्लीत नव्हे, तर बंगळुरूमध्येही प्रचंड प्रदूषण आहे आणि वांद्र्यात समुद्रासमोरील भागातही हवेचा दर्जा कमालीचा खराब असतो. खराब व प्रदूषित हवेमुळे लोकांना श्वसनाचे आजार होतात आणि काहींना, तर कर्करोगही होतो, याचा उल्लेख कामत यांनी सोशल मीडियावर केला आहे. ते लिहितात की, वांद्रे समुद्रकिनारा वा बंगळुरूच्या जेपी नगरमध्ये हवेचा दर्जा खराब असूनही घरांच्या किमती चढ्या आहेत. पण, हवा व पाण्याचा दर्जा आणि घरांच्या किमती यांची सांगड घालणे आवश्यक आहे. जिथे दर्जा वाईट, तिथे घरांच्या किमती कमी असाव्यात आणि जिथे तो उत्तम आहे, तिथे लोकांनी राहायला यावे, यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. नितीन कामत यांनी मांडलेला विचार प्रत्यक्षात येईल का कोणास ठाऊक, पण किमान आपण घर घेताना हा मुद्दा लक्षात घ्यायलाच हवा

# विक्रमादित्य चंपावती महोत्सवाचे बक्षीस वितरण धुमधडाक्यात संपन्न!

## ट्विनकलिंग स्टार स्कूल आणि आदर्श विद्यालय उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडकाचे मानकरी!

### १४ हजार सात बाल कलाकारांच्या सहभागामुळे चंपावती महोत्सवात लिमका गिनीज बुकाच्या उंबरठ्यावर!



बीड, प्रतिनिधी- कलाकारांचा अनोखा महाकुंभ बनलेल्या कलावैभवसिद्ध बालेकिल्ल्याचा विक्रमादित्य चंपावती महोत्सवाचे बक्षीस वितरण काल रोजी मोठ्या धुमधडाक्यात संपन्न झाले असून १४ हजार सात बाल कलाकारांच्या सहभागामुळे चंपावती महोत्सव लिमका गिनीज बुकाच्या उंबरठ्यावर जाऊन पोहचला. चंपावती महोत्सवात दि. १ फेब्रुवारी पासून ते दि. ८ फेब्रुवारी पर्यंत नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, रांगोळी अशा विविध स्पर्धा पार पडल्या. या सर्व स्पर्धांचे बक्षीस वितरण काल रोजी संपन्न झाले. ज्यामध्ये ३६४ विजेत्या बाल कलाकारांना पारितोषिके देण्यात आली. चंपावती महोत्सवात नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, रांगोळी स्पर्धेत उत्कृष्ट सादरीकरण करत सर्वाधिक बक्षिसे मिळवणा-्या इंग्रजी माध्यमाती ट्विनकलिंग स्टार स्कूल आणि मराठी माध्यमातून आदर्श विद्यालयाने उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडकावर आपले नाव कोरले तर जेष्ठ संगीतकार भरत अण्णा लोळगे, नृत्यकर्मी सौ अनुराधा निकम, नाट्य कलावंत महेंद्र खिल्लारे, नृत्यकर्मी वैभवी टाकणखर आणि समाजसेवक डॉ गणेश ढवळे यांना चंपावती सन्मान या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीड कलाकार आणि शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक आणि स्वप्नील गलधर यांच्या संकल्पनेतून साकार झालेला चंपावती महोत्सव लिमका गिनीज बुकमध्ये नोंद करून बीडचा नवा इतिहास रचण्यासाठी तयार झाला असून लवकरच लिमका गिनीज बुक टीमला पाचरण करणार असल्याची माहिती चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे यांनी दिली आहे. चंपावती महोत्सवाचे बक्षीस वितरणासाठी प्रमुख अतिथी राष्ट्रवादी नेते अमरसिंह पंडित आणि दै लोकाशाचे संपादक विजय बंब उपस्थित होते. याबरोबरच शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर तथा बीड जिल्हा शिवसेनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

-----

-----

### बाल कलाकारांच्या हक्काचा चंपावती महोत्सव कदापि बंद होऊ देणार नाहीत- जगताप, मुळूक, गलधर

चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धा आता आमची राहिलेली नसून ती जिल्ह्याभरातील बाल कलाकारांच्या हक्काची आणि जिव्हाळ्याची स्पर्धा बनली आहे. बाल कलाकार इथे एकत्रित येऊन कलेचा आविष्कार सादर करतात, बक्षीसे मिळवतात यामुळे कलाकार आणि शिवसेनेच्या प्रेमाचा हा उत्सव आम्ही कदापि बंद होऊ देणार नाहीत. चंपावती महोत्सव चंपावती महोत्सव एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धा वर्षनुवर्षे सुरु राहील आणि यातून हजारो कलाकार घडत राहतील व बीडचे नाव राज्याच्या आणि देशाच्या गाजत राहील असा निर्धार शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांनी आपल्या भाषांनातून केला.

### उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त बाल कलाकारांना रंगमंच मिळाला- अमरसिंह पंडित

कलाकारांचा बालेकिल्ला म्हणून बीड जिल्हा ओळखल्या जातो. याच बालेकिल्ल्यातील १४ हजार सात बाल कलाकारांना उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त रंगमंच मिळाला याचे मनस्वी समाधान आहे. विद्यार्थ्यांच्या कलेला वाव मिळावा म्हणून शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिनभैय्या मुळूक आणि स्वप्नील भैय्या गलधर यांनी चंपावती महोत्सवाचे सुंदर असे आयोजन केलेले आहे असे मत राष्ट्रवादीचे नेते अमरसिंह पंडित यांनी व्यक्त केले.

------

# आष्टीवरुन पंकजा मुंडें अन सुरेश धस यांच्यात वादंग, इकडे नाही तर तुमच्या मतदारसंघावरः धस यांचा टोला

**पंकजा ताईनी यांनी मुळ मतदार संघावर जास्त लक्ष द्यावे. तिकडे सर्व हायजॅक झाला आहे. निवडणुकीत पंकजाताई यांनी आपला केवळे केज हा एकाच मतदार संघ असल्याचे म्हटले होते. मग आता आष्टी हा कसा तुमचा मतदार संघ झाला?**

भारतीय जनता पक्षातील दोन नेत्यांमधील मतभेद पुन्हा समोर आले आहे. भाजप नेत्या आणि पर्यटन मंत्री पंकजा मुंडे यांनी भाजप आमदार सुरेश धस यांच्या मतदार संघात सोमवारी सभा घेतली. या सभेत आपले आष्टीवर विशेष लक्ष असणार असल्याचे सांगितले. पंकजा मुंडे यांच्या या वक्तव्यावर आष्टीतील भाजप आमदार सुरेश धस यांनी पलटवार केला आहे. तुम्ही तुमचा मतदार संघ सांभाळा, आष्टीकडे लक्ष देण्यास आपण समर्थ आहोत, तसेच निवडणुकीत काय म्हणाल्या होत्या? त्याची आठवणही सुरेश धस यांनी पंकजा मुंडे यांना करुन दिली.

**काय म्हणाले सुरेश धस**

आष्टीवर आपले विशेष लक्ष असणार आहे, या पंकजा मुंडे यांच्या वक्तव्याचा समाचार घेताना आमदार सुरेश धस म्हणाले, आष्टीवर त्यांनी गेल्या निवडणुकीत खूप प्रेम केले होते. आजच्या कार्यक्रमातही त्यांचे ज्याच्यावर प्रेम असतील ते लोकच त्या ठिकाणी आले असतील. या कार्यक्रमात आणि भाजपच्या लोकांवर प्रेम करण्यास मी समर्थ आहे. त्यांनी त्यांच्यावर प्रेम करु



शिट्टीवाले, घड्याळ्यावाले हजर असतील. एकवेळा तुम्ही कॅमेरा उपस्थित लोकांवर फिरवा. आष्टीतील भाजपच्या कार्यकर्त्यांवर नये, अशी माझी विनंती आहे.सुरेश धस पुढे म्हणाले, पंकजा ताईनी यांनी मुळ मतदार संघावर जास्त लक्ष द्यावे. तिकडे सर्व हायजॅक झाला आहे. निवडणुकीत पंकजाताई यांनी आपला केवळे केज हा एकाच मतदार संघ असल्याचे म्हटले होते. मग आता आष्टी हा कसा तुमचा मतदार संघ झाला? पंकजा मुंडे यांनी जास्तीत जास्त लक्ष त्यांच्या केजमधील राखेवर द्यावे, वाळूवर द्यावे, त्यांच्या मतदार संघात गायरान जमीनी हडप केल्या गेल्या आहेत, तिकडे द्यावे. आमच्या मतदार संघावर लक्ष देऊ नये, असे सुरेश धस यांनी त्यांना सुनावले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज ठाकरे यांच्या भेटीवर आमदार सुरेश धस यांनी मत व्यक्त केले. ते म्हणाले, राज ठाकरे यांचे बोलण लोकांना अपील होत असते. त्यामुळे त्यांनी नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीच्या संदर्भात जी भूमिका मांडली होती, त्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्री गेले असतील.

# सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्रांना महिनाभर मुदतवाढ द्यावी

## ; सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयात सोयाबीन उधळत लक्ष्यवेधी आंदोलन :- डॉ.गणेश ढवळे

बीडः- ( दि.१० ) बीड जिल्ह्यातील सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्रें बंद झाल्याने २३ हजार शेतक-यांचे सोयाबीन खरेदीविना घरात पडुन असुन शेतक-यांना खुल्या बाजारात सोयाबीन विकावे लागुन प्रति क्विंटल १००० रूपये आर्थिक नुकसान टाळण्यासाठी हमीभाव खरेदी केंद्रांना महिनाभर मुदतवाढ देण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१० सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्रांना मुदतवाढ द्यावी घोषणाबाजी करत सोयाबीन उधळुन सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाबद्दल तिव्र संताप व्यक्त केला.यावेळी आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार,पांडुरंग हराळे, बप्पासाहेब पवार, बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, बीड जिल्हा सचिव इंटक सखाराम बेंगडे आदी सहभागी होते. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पणनमंत्री जयकुमार गोरे, विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांना निवेदन देण्यात आले.

सविस्तर माहितीस्तव बीड जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतक-यांपैकी ४४ हजार ७४४ शेतक-यांनी नाफेडकडे सोयाबीन खरेदीसाठी १ आक्टोबर ते १५ सप्टेंबर पर्यंत ऑनलाईन अर्ज केले होते. त्यानंतर १५ आक्टोबर २०२४ पासुन नाफेडच्या वतीने जिल्ह्यातील ३० केंद्रावर ६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत जिल्ह्यातील २० हजार




९६९ शेतक-यांची ५ लाख ९४ हजार २०१ क्विंटल सोयाबीन खरेदी करून केंद्र बंद करण्यात आले.मात्र नोंदणी केलेले २३ हजार ७७५ शेतकरी वंचित राहिले असल्याने आजही त्यांच्या घरात सोयाबीन पडुन आहे.हमीभाव खरेदी केंद्रे बंद झाल्याने शेतक-यांना प्रति क्विंटल १००० रुपये आर्थिक नुकसान ; शेतक-ंची बिनबोभाट लुट शासनाने हमीभाव खरेदी केंद्रे बंद केल्याने आता शेतक-यांना हे सोयाबीन खुल्या बाजारात बेभावाने विकावे लागणार आहे.शासनाने यावर्षी सोयाबीनला ४८९२ रुपये हमीभाव दिला होता. खर्च आणि उत्पन्नाचे गणित जुळवताना हा भाव शेतक-यांना परवडणारा नाही.मात्र पर्याय नसल्याने शेतकरी शासनाच्या खरेदी केंद्रावर सोयाबीन विक्री करत होते.आता हे खरेदी केंद्रेही बंद केल्याने शेतक-यांना खुल्या बाजारात ३८०० ते ४००० रूपये प्रति क्विंटल दराने बेभाव विक्री करावी लागत आहे. वास्तविक पाहता आधारभूत धान्य खरेदी किंमतीपेक्षा कमी दराने सोयाबीन अथवा ईतर कोणताही शेतीमाल खरेदी करणं कायद्याने गुन्हा आहे.परंतु याची पडताळणी करणारी यंत्रणाच नसल्याने शेतक-यांची बिनबोभाट लुट सुरू आहे.

त्यामुळे शासनाने हमीभाव खरेदी केंद्रांना महिनाभर मुदतवाढ द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.सरकार दुतोंडी त्यांचे दाखवायचे दात वेगळे आणि खायचे वेगळे :- डॉ.गणेश ढवळे अर्थमंत्री निर्मला सितारामन म्हणतात विकासाचे पहिले इंजिन कृषी क्षेत्र आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणतातङ्कृषी क्षेत्रासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (Artificial Intelligence) वापर करा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नेहमीप्रमाणे म्हणतात ङ्महाराष्ट्राचा दुष्काळ संपवणारङ्घ कृषी मंत्री शेतक-यांना ड्रोनचा शेतीमध्ये वापर करण्याचा सल्ला देतात मात्र दुसरीकडे शेतकरी विरोधी धोरणे राबवतात. एकंदरीत सरकारचा हा दुटप्पीपणा असुन यांचे दाखवायचे दात वेगळे आणि खायचे दात वेगळे आहेत.याबद्दल शेतक-यांमध्ये तिव्र नाराजी आहे.

# शासकीय आधारभूत खरेदी केंद्र तात्काळ सुरु करा अन्यथा तीव्र आंदोलन - राजेभाऊ फड

परळी वैजनाथ तालुक्यातील शासकीय आधारभूत खरेदी केंद्र बंद पडल्याने सोयाबीन उत्पादक शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. शेतकऱ्यांना हमीभाव मिळावा यासाठी सरकारने तातडीने खरेदी केंद्रे सुरू करावी, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी दिला आहे. परळी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर सोयाबीनचे उत्पादन होते. मात्र, यंदा खरेदी केंद्र वेळेवर न उघडल्याने शेतकऱ्यांना हमीभावाऐवजी बाजारात कमी दर मिळत आहे. परिणामी, त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. नाफेड कडे नोंदणी केलेल्या सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांपैकी केवळ ५०% शेतकऱ्यांची सोयाबीन खरेदी करण्यात आली आहे. अजूनही नोंदणीकृत शेतकरी प्रतीक्षेत असून वाहनांच्या लांबच लांब रांगा खरेदी केंद्राबाहेर लागल्या आहेत. परळी वैजनाथ तालुक्यात एकूण तीन शासकीय हमीभाव केंद्र असून ती एकतर वेळेवर सुरू झाले नाहीत, सुरू करण्यात आले तरी अल्प कालावधीसाठी सुरू ठेवण्यात आले होते. शेतकऱ्यांची लाखो टन सोयाबीन अद्यापही घरी पडून आहे. शासकीय हमीभाव केंद्र बंद करण्यात आले असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड आक्रमक झाले आहेत. शासन आणि प्रशासनाला इशारा देत त्यांनी म्हटले आहे की, शेतकऱ्यांना हमीभाव मिळण्यासाठी सरकारने तातडीने पावले उचलली पाहिजेत. शासकीय हमीभाव केंद्रामार्फत सुरू असलेली खरेदी का बंद करण्यात आली? असा सवाल त्यांनी विचारत खरेदी केंद्र तातडीने सुरू करण्यात यावीत अशी मागणी केली आहे. हमीभाव केंद्र सुरू करण्यास उशीर झाल्यास हजारो शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होईल आणि त्याचा फटका ग्रामीण अर्थव्यवस्थेला बसू शकतो. सरकारने या गंभीर परिस्थितीकडे त्वरित लक्ष द्यावे, अन्यथा आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल. आम्ही केलेल्या मागणीची तत्काळ दखल न घेतल्यास शेतकऱ्यांना सोबत घेऊन पक्षाच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. बीड जिल्ह्यात नाफेडचे ३० सोयाबीन खरेदी केंद्र आहेत. या खरेदी केंद्राच्या माध्यमातून अर्ध्या शेतकऱ्यांचे देखील सोयाबीन खरेदी करण्यात आले नाही.

## आ.सुरेश धस यांनी शेतकऱ्यासह अधिकारी यांची घेतली बैठक

आष्टी । प्रतिनिधी न्यू आष्टी रेल्वे स्टेशन येथे अहमदनगर-बीड-परळी रेल्वे महामार्ग व सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग अंतर्गत भूसंपादन विषयी महत्वपूर्ण बैठक पार पडली. आष्टी मतदारसंघातील शेत रस्ते, वस्ती रस्ते आणि प्रलंबित मावेजा यासंदर्भात शेतकऱ्यांच्या तक्रारींची सविस्तर चर्चा करण्यात आली. ही बैठक विकसनशील आमदार सुरेश धस यांनी आयोजित केली होती. या बैठकित जिल्हाधिकारी अविनाश पाठक, उपविभागीय अधिकारी वसिमा शेख, लोळगे, उपमुख्य अभियंता मध्य रेल्वे अहमदनगर, प्रकल्प संचालक राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अहमदनगर, कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बीड, कार्यकारी अभियंता बांधकाम उपविभाग आष्टी-शिरूर का., उपाधीक्षक भूमी अभिलेख आष्टी शिरूर का., तालुका कृषी अधिकारी आष्टी-शिरूर का., वनपरिक्षेत्र अधिकारी आष्टी-शिरूर का. आदी अधिकारी उपस्थित होते. यावेळी आ. धस यांनी शेतकऱ्यांचे चुकीच्या पद्धतीने झालेल्या भूसंपादनासह अतिरिक्त भूसंपादनाविषयी नाराजी व्यक्त केली. यावर जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व संबंधित विभागांना योग्य तो निर्णय घेण्याच्या सूचना दिल्या. सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग हा नांदूर, बाळेवाडी, कुंभेफळ, खुंटेफळ, चिंचोली, केळसांगवी, चिखली, जामगाव या गावांमधून जाणार आहे. ड्रोन सर्वे आणि जी.एम. फायनल झाले असले तरी, काही शेतकऱ्यांनी त्यावर आक्षेप नोंदवले आहेत. हा प्रश्न समोर आला. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी सविस्तर चर्चा करून योग्य निर्णय घेतला जाईल असा शब्द दिला.

यामुळे या बैठकीत शेतकऱ्यांच्या शंकाचे निरसन करण्यात आले. शेतकऱ्यांना मावेजा मिळविण्यात कसल्याही प्रकारची अडचण येऊ नये म्हणून आ. सुरेश धस यांनी घेतलेला पुढाकार पाहता शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त करण्यांत येत आहे.

## लाडक्या बहिणीचे भविष्य आता ग्रामसेवकाच्या हाती

बीड । प्रतिनिधी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलेचा मृत्यू झाल्यास त्या महिलेचा लाभ कसा बंद करायचा, हे आता राज्य सरकार पुढचे मोठे आव्हान ठरणार आहे. त्यासाठी ग्रामीण भागात ग्रामसेवकावर याची माहिती देण्याची जबाबदारी देण्याचा शासन विचार करीत आहे. ग्रामसेवकाने गावातील मतदार यादीनुसार महिलांचे वय आणि व्यवसाय याची माहिती शासनाला सादर करण्याचे आदेश नव्या प्रणालीमध्ये देण्यात आले आहेत त्यामुळे आता लाडक्या बहिणीचे भवितव्य ग्रामसेवकांच्या हाती आहे. त्यामुळे प्रादेशिक परिवहन विभाग, प्राप्तिकर विभाग, महसूल विभाग यांच्या बरोबरच ग्रामविकास विभागाचाही सहभाग या योजनेत घेण्याचा शासनाचा विचार आहे. सरकारी नोकरीचे निवृत्तिवेतन घेणाऱ्या व्यक्तीला दरवर्षी हयातीचा दाखल सादर करावा लागतो.






त्याआधारे संबंधित निवृत्तिवेतन धारकाचे निवृत्तिवेतन सुरु ठेवायचे किंवा बंद करायचे याचा निर्णय घेतला जातो. मात्र तशी तरतूद या योजनेसाठी केल्यास या कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी अनावश्यक रीत्या महिलांना धावपळ करावी लागेल. त्यापेक्षा ग्रामसेवकांना ही जबाबदारी देण्याचा विचार शासन स्तरावर सुरु असल्याचे समजते. राज्य शासनाने लाडक्या बहिणीची पडताळणी सुरू केली आहे तिच्या बहिणीकडे चार चाकी गाडी आहे त्यांना यातून वगळण्याची मोहीम हाती घेतली आहे त्यासोबतच आधार लिंक असलेल्या खात्यासह इतर खात्यावर त्यांची अमानत रक्कम अधिक आहे याची पडताळणी त्या आधार नंबर वरून घेतली जात आहे असे असताना आता ग्रामीण स्तरावर लाडक्या बहिणीच्या सत्यता पडताळणीचा शोध ग्रामसेवकाकडून घेण्यात येणार आहे संबंधित ग्रामसेवकाकडे त्या गावातील यादी दिली जाणार आणि त्याने त्या यादीनुसार गावातील सर्वेक्षणाचा अहवाल व्हिडिओ यांच्याकडे देणे व्हिडिओ यांनी तहसीलदार आणि त्यांनी जिल्हाधिकाऱ्याकडे सुपूर्द करणे त्यानंतर याची चाळणी होऊन जा खऱ्या लाभार्थी आहेत त्यांना लाभ दिला जाणार तर उर्वरित ग्रामसेवकाच्या अहवाला आम्हाला नंतर यावर निर्णय घेतला जाणार आहे त्यामुळे आता लाडक्या बहिणीचे भवितव्य ग्रामसेवकाच्या रिपोर्टवर अवलंबून आह

## संत गजानन महाराज मंदीरात आज विविध कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी सोमवार दि. १० रोजी भगवान विश्वकर्मा जयंती दिनाचे औचित्य साधून शहरातील सहयोग नगर भागात असलेल्या श्री संत गजानन महाराज मंदिरातील नुतन वास्तुप्रवेश, कलश पुजन व श्रीसत्यनारायण महापुजेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या निमित्त आयोजित महाप्रसादाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन गजानन सांस्कृतिक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. शहरातील पुरातण असे श्री संत गजानन महाराजांचे भव्य मंदीर असून गेल्या काही दिवसांपासून या मंदिराच्या नुतनीकरणाचे काम सुरू होते. हे काम पूर्णत्वाकडे आले असून या नुतन भव्य अशा मंदीरात दि. २० फेब्रुवारी रोजी गजानन महाराज प्रगट दिन साजरा होणार आहे. त्यापुर्वी मंदीरात सत्यनारायण पुजा आयोजित करण्यात आली असून रमेशलाल जाजू आणि रमेश भोसले यांच्या हस्ते विधीवत पुजन करण्यात येणार आहे. तर मंदीराच्या नुतनीकरणाचे उर्वरीत काम प्रगटदिनानंतर भाविकांच्या सहकार्यातून केले जाणार आहे.

## खतांच्या खरेदीत तब्बल ८७ कोटींचा भ्रष्टाचार नाना पटोलेंचा कृषी विभागावर गंभीर आरोप

कृषी विभागाने शेतकऱ्यांच्या नावावर नॅनो युरिया व नॅनो डीएपीच्या १५८ कोटी रुपयांच्या खरेदीत ८७ कोटींचा भ्रष्टाचार केला असल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी रविवारी केला. तसेच, ङ्गया भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करण्याचे धाडस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दाखवावेफ, असे आव्हानही त्यांनी दिले. महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाने नागपूरच्या पालिवाल माहेश्वरी हाऊस ऑफ बिझनेस एँड रिसर्चमार्फत हा भ्रष्टाचार केल्याचा पटोले यांचा आरोप आहे. ङ्गमहामंडळाने नॅनो युरिया व नॅनो डीएपी उत्पादनासाठी कच्चा माल खरेदी करण्याकरिता अग्रिम



स्वरूपात १५८.७९२ कोटी रुपयांचा निधी अदा करून घेतला.महामंडळ नॅनो युरिया व नॅनो डिएपी हे ङ्गइफ्कोफकडून विकत घेऊन पुरवठा करणार होते. यात कच्चा माल खरेदीचा प्रश्न येत नाही. ही खरेदीप्रक्रिया कृषी विभागाच्या इतर प्रक्रियेप्रमाणे लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू असताना निवडणूक आयोगाची परवानगी न घेता बेकायदा पद्धतीने करण्यात आलीफ, असे पटोले म्हणाले.या खरेदीप्रक्रियेत मएमएआयडीसीफचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. महेश गोंदावले, महाव्यवस्थापक ( लेखा व वित्त ) सुजित पाटील व उपमहाव्यवस्थापक ( खते ) महेंद्र धांदे यांचा सहभाग असून, त्यांची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी नाना पटोल यांनी या वेळी केली.

## प्रभू विश्वकर्मा जयंती उत्सवासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे -सुभाष खोगर



बीड । प्रतिनिधी शहर व पंचक्रोशीतील भाविकांना आवाहन करण्यात येते की दि.१०/२/ २०२५(सोमवार) रोजी विश्वकर्मा मंदिर तळेगाव येथे प्रभू विश्वकर्मा जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार आहे.याच कार्यक्रमात समाजबांधवांना विश्वकर्मा यौजनेबाबत माहिती देण्यासाठी संबंधित अधिकारी उपस्थित रहाणार आहेत. यानिमित्त भव्य असे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे.तसेच या कार्यक्रमात समाजातील विविध क्षेत्रात लौकिक मिळविलेल्या समाजबांधवांचा सन्मान करून नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे तरी सर्व भाविकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा.

## मित्रासोबत खेळताना विहिरीत पडून तरुणाचा मृत्यू

शाळा सुटल्यानंतर शेत शिवारामध्ये – मित्रांसोबत खेळत असताना विना संरक्षण कठडा विहिरीत पडून – एका अठरा वर्षीय युवकाचा मृत्यू – झाल्याची दुर्दैवी घटना शनिवारी (दि.७) रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास पाचोड येथे घडली. रोहित संतोष मेहतर असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. याविषयी अधिक माहिती अशी की, पाचोड येथील शिवाजीनगर भागातील संतोष मेहतर हा शनिवारी आपल्या मित्रांसोबत गावाच्या बाहेर असणाऱ्या एका विना संरक्षण कडे विहीरीजवळ खेळत होता. मात्र, यावेळी त्याचा अचानक तोल गेला आणि तो त्या विहिरीत पडला. यावेळी त्याच्यासोबत असणाऱ्या मित्रांनी आरडाओरड केली. परंतू, तोपर्यंत रोहीत मेहतर हा पाण्यात बुडाला होता. या घटनेची माहिती त्याच्या मित्रांनी तातडीने त्याच्या नातेवाईकांना दिली. त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन गावकऱ्यांच्या मदतीने त्यास विहीरीतून बाहेर काढून उपचारासाठी पाचोड येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले असता, कार्यरत असणारे वैद्यकीय अधिकारी डॉ. आसाराम चौरे यांनी त्यास तपासून मृत घोषीत केले. या घटनेची नोंद पाचोड पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक शरदचंद्र रोडगे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार अण्णासाहेब गव्हाणे करीत आहेत.

## जोपर्यंत लोकांना मी हवी आहे काम करीत राहणार, अन्यथा मी घरच्या गादीवर बसेल- मुंडे

बीड। प्रतिनिधी जोपर्यंत लोकांना मी हवी आहे, तोपर्यंत मी काम करत राहील. ज्यावेळेस लोक म्हणतील की आता आम्हाला तुमची गरज नाही त्यावेळेस मी घरच्या गादीवर बसेल असं वक्तव्य मंत्री पंकजा मुंडे यांनी केलं आहे. या लोकांनी ऊस तोडू नये असं मला हृदयातून वाटतं. मात्र, यांची पुढची पिढी आता ऊस तोडणार नाही असे वक्तव्य पंकजा मुंडे यांनी केलं. ऊसतोड कामगारांसाठी ही पंकजाताई नेहमी उभी राहील असेही त्या म्हणाल्या. पब्लिक आपली करायची म्हणून मला गडावर जाऊ वाटत नाही असेही पंकजा मुंडे म्हणाल्या. राजकारणामध्ये आणि धर्म कारणांमध्ये एकमेकांबरोबर त्यांचं नातं असलं पाहिजे पण तेवढीच वृत्ती पण असली पाहिजे असेही त्या म्हणाल्या. धर्मसत्ता आणि राजसत्ता हातात हात घालून चालत असते. बीड जिल्ह्यातले २५ ते ५० हजार कुंभमेळयात जाऊन डुबकी मारून आलेत. म्हणजे पुढचे पाप करायला मोकळे



झालेत का? असा सवाल मुंडे यांनी केला. भगवान बाबांच्या दर्शनासाठी मला कुठेही जावे लागत नाही. मी डोळे जरी झाकले तरी मला साक्षात भगवान बाबाचे दर्शन होतं. मी स्वतः भगवान बाबा पाहिले नाहीत मात्र अनेक काहण्या ऐकल्या आहेत असंही मुंडे म्हणाल्या. कोयत्यांना धार देण्यासाठी मी कायम

### पुढची पिढी आता ऊस तोडणार नाही-पंकजा मुंडे


उभी राहील असेही पंकजा मुंडे म्हणाल्या. हा वाक्यप्रचार रुढ आहे. तुम्ही लगेच काहीही लावता असेही पंकजा मुंडे म्हणाल्या. मी कोणत्या गुंडाला घाबरत नाही. मी गुंडाला गुंड आणि बंडाला बंड आहे. मी कशामुळे नवीन पक्ष स्थापन करेल. दिल्लीमध्ये नरेंद्रजी मोदी यांची सत्ता आहे. राज्यात देवेंद्रजी मुख्यमंत्री आहेत. मी स्वतः मंत्री आहे असं असताना मी नवीन पक्ष का काढेल? असे पंकजा मुंडे म्हणाल्या. मला मंत्री झाले काय नाही झाले काय, काही फरक पडत नाही. एवढे प्रेम तुम्ही करता असंही पंकजा मुंडे म्हणाल्या. पण मंत्रीपदामुळं अधिकार येतात असंही त्या म्हणाल्या. १८२५ दिवस आहेत माझ्याकडे सत्तेचे. वरचे २२५ दिवस असेच जातात. माझ्या १६०० दिवसात राज्यातील प्रत्येक भागात माझ्या विभागाकडून न्याय देण्याचं काम करेल असेही मुंडे म्हणाल्या.

## भाजपाच्या दिल्लीतील विजयाचा पिंपळनेरमध्ये जल्लोष

पिंपळनेर-प्रतिनिधी दिल्ली विधानसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीला घवघवीत यश मिळाले असून, हा विजय उत्सव महायुतीच्या वतीने पिंपळनेर येथील भाजप कार्यकर्त्यांनी फटाके फोडून, पेढे वाटप करत विजय उत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी पदाधिकाऱ्यांसह महायुतीचे कार्यकर्ते उपस्थित होते. महायुतीचे वारे देशभर असल्याने देशात सर्वत्र महायुतीचीच सत्ता आहे. केंद्र सरकारच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला मोठ्या प्रमाणात विकासयोजना मिळत असल्याने दिल्लीतही भाजपची सत्ता आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जनतेचा विश्वास असून, सर्वसामान्य जनतेचा मसिहा म्हणून जनता त्यांच्याकडे पाहात आहे. गेल्या बारा वर्षांत केजरीवाल सरकारने फक्त आश्वासन देऊन लोकांना झुलवण्याचे काम केले असून, हा विजय म्हणजे विरोधी पक्षांची आघाडी नेस्तनाबूत झाली असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर लोकांनी टाकलेला अढळ विश्वास असल्याचे दिसून येते. पिंपळनेर सह परिसरात ठिकठिकाणी लाडू वाटप करीत व फटाक्यांची आतषबाजी करीत विजय उत्सव साजरा करण्यात आला

# भारत डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफला रोखठोक प्रत्युत्तर देण्याच्या तयारीत

दिल्ली, (वृत्तसेवा):- भारतानेडोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ अॅटॅकला रोखठोक प्रत्युत्तर देण्याची तयारीत केली आहे. ग्लोबल टॅरिफ वॉरचा सामना करण्यासाठी भारताने चार युरोपीयन देशांसोबत फ्री ट्रेड सुरू करण्याच्या निर्णय घेतला आहे. यामुळे या देशांसोबत कुठल्याही अडथळ्याशिवाय भारताचा व्यापार चालू शकेल. अमेरिकेच्या टॅरिफ समस्येचा सामना करण्यासाठी भारत आणि हे चारही युरोपीयन देश एकत्रितपणे मार्ग काढण्याच्या तयारीत आहे. यासाठी भारत वाणिज्य मंत्रालयांतर्गत एत्रळ्ढड डेस्क स्थापन करेल. एत्रळ्ढड म्हणजे, युरोपियन फेडरेशन ट्रेड अॅग्रीमेंट. यासाठी गेल्या वर्षी १० मार्च रोजीच एत्रळ्ढ- सोबत करार करण्यात आला होता. सोमवारी



भारत सरकारने यासंदर्भात माहिती दिली. एत्रळ्ढड म्हणजे युरोपियन युनियन बाहेरील चार देशांचा समूह आहे. यात स्वित्झर्लंड, नॉर्वे, आइसलँड आणि लिकटेंस्टाईन देशांचा समावेश आहे. या कराराला ढएझ- अर्थात व्यापार तथा आर्थिक भागीदारी करार असे नाव देण्यात आले आहे. या वर्षाच्या अखेरपर्यंत हा करार लागू होणे अपेक्षित आहे. वाणिज्य तथा उद्योग मंत्री पियुष गोयल यांच्या हस्ते, भारत मंडपम येथे ईएफटीए ब्लॉकच्या प्रतिनिधींसह ईएफटीए डेस्कचे उद्घाटन करण्यात येईल.स्वित्झर्लंडचे परराष्ट्रमंत्री हेलेन बुडलिगर आर्टिडा, नॉर्वेचे व्यापार आणि उद्योग मंत्री टॉमस नॉर्वोल, आइसलँडचे परराष्ट्र मंत्री मार्टिन आयजॉल्फसन आणि लिकटेंस्टाईनचे परराष्ट्र मंत्री डोमिनिक हॅस्लर हे देखील यावेळी उपस्थित राहतील. डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ अॅटॅकनंतर, ग्लोबल लीडर चिंतित असतानाच, भारताने ईएफटीए डेस्कची केलेली स्थापना अत्यंत महत्वाची आहे. या समूहाकडून भारताला गेल्या १५ वर्षांत १०० अब्ज अमेरिकन डॉलरच्या गुंतवणुकीचे प्रस्ताव मिळाले आहेत. याशिवाय, भारत २७ देशांचा समूह असलेल्या युरोपियन युनियनसोबत एक व्यापक मुक्त व्यापार करार करण्यासाठी स्वतंत्रपणे वाटाघाटी करत आहे.




बीड : बीडच्या रेल्वे स्थानकावर विक्रेता म्हणून विक्री करणारा बीडचा पहिला विक्रेता.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार ११ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com



## राजस्थानी समाजाच्या स्मशान भूमीत गुंडाचा धुडगूस



माजलगाव-(प्रतिनिधी) शहरातील पावर हाऊस रोडवर सिंदफना काठावर राजस्थानी समाजाची सम्शानभूमी असून रविवारी सायंकाळी ७ वाजताच्या दरम्यान ५ ते ७ गुंडानी याठिकाणी घुसून उभा असलेला स्वर्गरथ फोडून टाकला. स्वर्ग र्थाचे चालक बाबुभाई यांना मारहाण केली. शिवाय या ठिकाणी राहण्यास असलेले गंगाधर गायकवाड यांची मोटर सायकल पेटवून दिली. माजलगाव मध्ये पोलीस प्रशासन आहे की नाही अशी परिस्थिती असून रात्री १० च्या दरम्यान पुन्हा काही गुंडानी सम्शान भूमीत घुसून अर्धवट जाळलेली मोटर सायकल पुन्हा पेटवून दिली. शहरातील पावर हाऊस रोड सिंधफना नदीच्या काठावर असलेल्या राजस्थानी समशानभूमी येथे अज्ञात ५ ते ७ गुंडानी येऊन स्वर्गरथाची तोडफोड केली आहे तसेच ड्राइव्हर बाबूभाई यांना मारहाण केली आहे. याठिकाणी मुक्कामी असलेल्या मसनंजोगी गंगाधर गायकवाड यांची मोटरसायकल जळण्याचा ही प्रयत्न ७ वाजता झाला यावेळी विरोध केला म्हणून स्वर्ग रथा चे चालक बाबुभाई यांना मारहाण केली. मोटर सायकल अर्धवट जळली असता रात्री पुन्हा१० वाजता येऊन गुंडानी ही मोटर सायकल जाळली.आता माजलगावची स्मशान भूमी पण सुरक्षित नाही. राजस्थानी समशानं भूमी चारी बाजूने बंदिस्त असल्यामुळे याठिकाणी रोटरी क्लब चा स्वर्ग रथ, शीतपेटी ठेवण्यात येते. शिवाय याठिकाणी गंगाधर गायकवाड यांचे कुटुंब ही वास्तव्यास असते. आजच्या या घटनेमुळे स्वर्ग रथाचे अतोनात नुकसान झाले असून चालक बाबू भाई यांनाही मार लागला आह

# वेदांनुसार डॉ. भीमराव आंबेडकर ब्राह्मणच ठरतात अभिनेता राहुल सोलापूरकर पुन्हा बरळला

### राहुल सोलापूरकर याने केलेल्या वादग्रस्त वक्यवानंतर जितेंद्र आव्हाड यांनी संताप व्यक्त केला



औरंगजेबाच्या तावडीतून सुटण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांनी लाच दिली होती, असं विधान अभिनेता राहुल सोलापूरकर याने केलं होतं. सोलापूरकर याच्या या विधानावरून राज्यभरात पडसाद उमटले होते. सोलापूरकरचा निषेध म्हणून राज्यभरात अनेक ठिकाणी मोर्चे, आंदोलनं करण्यात आले. सर्वच राजकीय पक्षांनीही सोलापूरकर याच्या विधानाचा निषेधही नोंदवला होता. तर छत्रपती उदयनराजे भोसले यांनी सोलापूरकरला गोळ्या घालण्याची भाषा केलेली होती. हा वाद अजूनही थांबलेला नसताच सोलापूरकर याने आणखी एक वादग्रस्त विधान केलं आहे. वेदांनुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ब्राह्मणच होते, असा जावई शोध राहुल सोलापूरकर याने लावला आहे. सोलापूरकर याने नवीन वादग्रस्त विधान करून पुन्हा एक वाद ओढवून घेतला आहे.नेमकं काय म्हणाला सोलापूरकर? रामजी सपकाळ यांच्या एका बहुजनाच्या घरात जन्माला आलेले एक भिमराव की जो आंबावडेकर नावाच्या एका गुरुजीकडून दत्तक घेतला जातो. त्याच नावावरून पुढे भिमराव आंबेडकर म्हणून मोठे होतात. त्यांनी प्रचंड अभ्यास केल्यामुळे वेदांमध्ये जस म्हटलं आहे, तसं ते अभ्यास करून मोठे झाले आहेत त्या आर्थाने वेदांमध्ये भीमराव आंबेडकर ब्राह्मण ठरतात असं वादग्रस्त वक्तव्य राहुल सोलापूरकर याने केलं आहे.राहुल सोलापूरकरने आता सर्वच मर्यादा ओलांडल्या आहेत. हा जिथे दिसेल तिथेच त्याला जोड्याने मारायला हवा. याच्यासारख्या मनुवाद्यांनीच महाराष्ट्राचे , देशाचे वाटोळे केले आहे. राहुल सोलापूरकरने छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबत केलेल्या वक्तव्याबद्दल माफी मागितलेली नाही. आता तर डॉः जितेंद्र आव्हाडांचा संतापदरम्यान राहुल सोलापूरकर याने केलेल्या वादग्रस्त वक्यवानंतर जितेंद्र आव्हाड यांनी चांगलाच संताप व्यक्त केला आहे. त्यांनी ट्विट करत संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. राहुल सोलापूरकरने आता सर्वच मर्यादा ओलांडल्या आहेत. हा जिथे दिसेल तिथेच त्याला जोड्याने मारायला हवा. याच्यासारख्या मनुवाद्यांनीच महाराष्ट्राचे , देशाचे वाटोळे केले आहे. राहुल सोलापूरकरने छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबत केलेल्या वक्तव्याबद्दल माफी मागितलेली नाही. आता तर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत बोलून सर्वच मर्यादा ओलांडल्या आहेत. याच्या डोक्यावर नसलेले केस उगवावे लागतील; ते कसे उगवायचे, ते बहुजन अनब आंबेडकरवादी ठरवतील. या मनुवाद्यांनाच छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा का त्रास होतो, हेच समजत नाही. याला दिसेल तिथे तुडवा !! असं ट्विट आव्हाड यांनी केलं आहे.

# मुलाचे अपहरण झाले नाही तर तो विमानाने: मुलगा बेपत्ता प्रकरणी तानाजी सावंत काय म्हणाले?

माजी मंत्री आणि शिवसेना नेते तानाजी सावंत यांचा मुलगा ऋषीराज सावंत पुणे विमातळावरुन बेपत्ता झाला आहे. सोमवारी दुपारपासून तो नॉट रिचेबल झाला आहे. या प्रकरणी पुणे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. त्याच्या शोधासाठी वेगाने हालचाली सुरु झाल्या आहेत. दरम्यान तानाजी सावंत यांनी पत्रकार परिषद घेत ऋषीराज सावंत यांचे अपहरण झाले नाही. तो न सांगता गेल्यामुळे आम्ही चिंताग्रस्त झाला आहोत, असे स्पष्ट केले. आता या प्रकरणी नवीन माहिती समोर आली आहे. ऋषीराज बँकॉककडे खासगी विमानाने निघाला होतो. आता रात्री ९ वाजेच्या सुमारास ऋषीराज सावंत पुणे विमानतळावर दाखल झाला आहे.काय म्हणाले तानाजी सावंत



शिवसेना नेते तानाजी सावंत म्हणाले की, माझा मुलगा ऋषीराज हा पुण्यावरुन विमानाने गेला आहे. त्याबाबत सिंहगड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. परंतु तो बेपत्ता झालेला नाही किंवा त्याचे अपहरण झालेले नाही. त्याच्यासोबत त्याचे दोन मित्र आहेत. माझ्या घरातील पद्धत अशी की कोणी कुठेही गेले तरी एकमेकांना सांगून जाते. ऋषीराज मला सांगितल्याशिवाय कुठे जात नाही. परंतु तो दुपारीपासून नाही. त्याने मला किंवा त्याच्या भावालाही काहीच सांगितले नाही. तसेच त्याने त्याची गाडी वापरली नाही. दुसऱ्याच्या गाडीने तो गेला आहे. त्याने फोनसुद्धा केला नाही. त्यामुळे तो पुणे विमानतळावर कसा गेला? हा प्रश्न आम्हा कुटुंबियांना पडला. मलासाठी आम्ही चिंताग्रस्त झाल्यामुळे पोलिसांना कळवले आणि तपास सुरु झाला आहे.मुलाबाबत गाडी चालकाने दिली माहितीमुलगा विमानतळावर गेला, ही माहिती तुम्हाला कशी मिळाली त्यासंदर्भात बोलताना तानाजी सावंत म्हणाले, तो ज्या गाडीने विमानतळावर गेला, त्या गाडीच्या चालकाने आम्हाला ही माहिती दिली. चालकही घाबरलेला आहे. तो म्हणाला मी त्याला विमानतळावर सोडून आलो. त्याच्यासोबत त्याचे दोन मित्र होते. परंतु ते कोण होते, त्याची माहिती आम्हाला नाही. तसेच तो कुठे गेला त्याची माहिती नाही. तो ज्या विमानाने गेला ते विमान चार्टड आहे की नियमित विमान यासंदर्भात कोणती माहिती अजून नाही, असे तानाजी सावंत यांनी सांगितले.

## १० वी, १२ वी परीक्षा केंद्राच्या परिसरात १४४ कलम जारी

बीड। प्रतिनिधी जिल्ह्यात माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा माहे फेब्रुवारी, मार्च, २०२५ मध्ये होत असून परीक्षेमध्ये गैरप्रकार टाळण्यासाठी, परीक्षा कॉपीमुक्त करण्याकरिता तसेच परीक्षा केंद्राच्या परिसरात शांतता तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हादंडाधिकारी अविनाश पाठक यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात दि. ११ फेब्रुवारी, २०२५ ते १८ मार्च, २०२५ या कालावधीत परिक्षेच्या वेळेच्या १ तास आगोदर ते परीक्षा संपेपर्यंतच्या कालावधीत परीक्षा केंद्राच्या परिसरात व परिक्षेचे साहित्य ठेवलेल्या ठिकाणी मनाई आदेश जारी केले आहेत. परिक्षा शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी परिक्षा चालू असतांना परीक्ष न देणारे विद्याथी आणि इतर काही घटक परिक्षा केंद्राच्या परिसरात परिक्षा चालू असतांना उपद्रव करित असतात. परिक्षा चालू असतांना कॉपी देण्याचा प्रयत्न करतात तसेच परिसरातील झेराक्स सेंटरचा कॉपी पुरविण्यासाठी दूरूपयोग होण्याची शक्यता लक्षात घेता परिक्षा देणा-य विद्यार्थ्यांना व परिक्षेसाठी नियुक्त अधिकारी ,कर्मचारी यांना बाहेरील व्यक्तींचा त्रास होऊ नये इयत्ता १२ व दहावीच्या परिक्षा केंद्राच्या ठिकाणी व परिक्षा केंद्राच्या १०० मिटर परिसरात फौज्दारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ ( २ ) करण्यात आले आहे. या परीक्षा केंद्राच्या परिसरात १४४ कलम जारी केला असून परीक्षा केंद्राच्या परिसरात १०० मीटर अंतरापर्यंत शासकीय कर्तव्ये पार पाडणाऱ्या अधिकारी, कर्मचारी, परीक्षार्थी यांच्या व्यवतिरिक्त दोन किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास, फोटोकॉपी, ई- मेल, इंटरनेट सुविधा, इतर दळणवळण, संदेश वहन साधने तसेच कोणत्याही व्यक्तीजवळ मोबाईल, वायरलेस सेट, कॅल्क्युलेटर, लॅपटॉप, संगणक बाळगण्यास, एस.टी.डी,आय.एस.डी मशिन, ध्वनीक्षेपक वाजविण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. शासकीय परिक्षेसंबधीत कर्मचाऱ्यांच्या व विद्यार्थ्यांच्या वाहना व्यतिरीक्त इतर अनाधिकृत वाहनांना परिक्षा केंद्राच्या १०० मिटर परिसरात येण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

# श्याम ठाणेदार यांचा राज्यस्तरीय पुरस्काराने गौरव

पुणे-प्रतिनिधी अनेक राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित महाराष्ट्रातील नामवंत स्तंभलेखक श्याम ठाणेदार यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. श्याम ठाणेदार यांना स्वराज्य क्रांती सेना पँथर्स आर्मी महाराष्ट्र राज्य यांच्या मार्फत दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श लेखक गौरव पुरस्कार २०२५ देण्यात आला आहे. श्याम ठाणेदार यांनी शैक्षणिक, सामाजिक, साहित्य, पत्रकारिता व लेखन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल आचार्य रतनलाल सोनाग्रा




(जागतिक कीर्तीचे विचारवंत), संतोष आठवले (राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष पँथर्स आर्मी स्वराज क्रांती सेना), विठ्ठलदादा गायकवाड, (मुख्य समन्वयक रमाबाई आंबेडकर राष्ट्रीय स्मारक पुणे), ब्रह्मकुमारी सुनंदा दीदी (वरिष्ठ राजयोग शिक्षिका पुणे ), विक्रम शिंगाडे (संस्थापक शिंगाडे चॅरिटेबल ट्रस्ट) यांच्या हस्ते हा अत्यंत मानाचा पुरस्कार देण्यात आला आहे. स्वराज्य क्रांती सेना पँथर आर्मी यांच्या द्वारे पुण्यातील श्रमिक पत्रकार भवन नवी पेठ येथे रविवार दिनांक ९ फेब्रुवारी २०२५ रोजी राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या पुरस्कार सोहळ्यात कला, साहित्य, सामाजिक, क्रीडा, सांस्कृतिक, शैक्षणिक, आरोग्य, सहकार, पत्रकारिता, कृषी अशा विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना विविध पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी लक्ष्मीकांत कुंबळे, आशुतोष येरल्लू , उमेश जामसंडेकर, समीर विकासपुरे, महेंद्र वाघमारे, संतोष लांडगे, सचिन माने, ॲड प्रीती पुजारी आदी मान्यवर उपस्थित होते.

# सुरेश धस अन आव्हाडांमध्ये पुन्हा जुंपली, लाँग मार्च ते अक्षय शिंदे सगळंच निघालं

## सुरेश धस यांनी आव्हाडांवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

पुन्हा एकदा राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड आणि भाजप आमदार सुरेश धस यांच्यामध्ये जुंपल्याचं पाहायला मिळत आहे. सुरेश धस यांनी पुन्हा एकदा जितेंद्र आव्हाड यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. मी संतोष देशमुख आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्यामध्ये भेदभाव करत नाही. लाँग मार्च निघाल्यापासून गेल्या २५ दिवसांमध्ये आव्हाडांनी एकदा तरी संर्पक केला आहे का? असा सवाल सुरेश धस यांनी उपस्थित केला आहे.

नेमकं काय म्हणाले सुरेश धस?

मी संतोष देशमुख आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्यामध्ये भेदभाव करत नाही. लाँग मार्च निघाल्यापासून गेल्या २५ दिवसांमध्ये आव्हाडांनी एकदा तरी संर्पक केला आहे का? जटील प्रश्नांमधून मार्ग काढण्यासाठी मी प्रयत्न केला, ती जर जूक असेल तर ती चूक मी केली. ज्या चिमुकलीवर बलात्कार झाला त्या आरोपीची वाह वाह करणारे तुम्ही आहात, अक्षय शिंदेंची वाह वाह करणारे कोणत्या मानसिकतेचे आहेत? असा हल्लाबोल सुरेश धस यांनी केला आहे.

पंकजा मुंडेंना टोला

भाजप नेत्या आणि मंत्री पंकजा मुंडे यांनी मोठं वक्तव्य केलं होतं. मला आष्टीवर जास्त प्रेम करावं लागेल, कारण परळी तिकडे राष्ट्रवादीला गेला आहे. मात्र हा मतदारसंघ आता भाजपकडे आहे, असं त्यांनी म्हटलं होतं. त्यानंतर आता सुरेश धस यांनी देखील या वक्तव्यावर जोरदार पलटवार केला आहे. तिकडे सगळं हायजॅक



झालं आहे, त्यामुळे आधी पंकजा मुंडे यांनी आपल्या मतदारसंघात लक्ष द्यावं असं सुरेश धस यांनी म्हटलं आहे. दरम्यान दुसरीकडे अंजली दमानिया यांनी देखील सुरेश धस यांच्यावर आरोप केले होते. सुरेश धस यांनी युटर्न का घेतला? असा सवाल त्यांनी उपस्थित केला होता. मात्र यावर बोलणं धस यांनी टाळलं आहे. दमानिया आणि अंधारे या माझ्या भगिनी आहेत, त्यामुळे मी त्यांचा आदर करतो असं धस यांनी म्हटलं आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com